म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १३४०

# भारताचे रणझुंजार



REFBK-0014436

४

विदर्भ मराठवाडा बुक कं. पुणे २

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थापना
अनुक्रम.................... वि: ..............
क्रमांक .................... नों: दि: ..............

भारताचे रणझुंजार माला : पुष्प ४ थें

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन

REFBK-0014436

लेखिका
सौ. शशिकला माधव ओक
बी. ए. (ऑनर्स); बी. एड्.

प्रथमावृत्ति १९६५

**मूल्य रु. १·२५**

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

मुद्रक :
**वि. ग. माटे**
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव पेठ, पुणें ९.

प्रकाशक :
**अ. ज. प्रभु**
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति १९६५

**मूल्य रु. १·२५**

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

मुद्रक :
**चि. ग. साटे**
विश्वकर्मा मुद्रणालय
२९५ सदाशिव पेठ, पुणें ९.

प्रकाशक :
**अ. ज. प्रभु**
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणें २.

प्रणाम

जयीं उजळिल्या जीवांच्या ज्योति,
अन् तेजाळलें स्वदेश-मंदिर.
जीवित अपुलें मानुनि तृणवत्
मिळविली जयांनीं थोर दिगंता कीर्ति—
त्या नरवीरां रणझुंजारां
असोत अमुचे लाख प्रणाम

## सरदार परशुरामभाऊ पटवर्धन


* पूर्वेतिहास
* पहिला विजय
* हैदरचा बंदोबस्त
* काळ आला होता पण—
* मोती तलावावरील महापराक्रम
* इंग्रजांवर मात
* सुरापूरची मोहीम
* वाघाशीं झुंज
* एका इंग्रज सेनापतीला दिलेला धडा
* खर्ड्याची लढाई
* दुर्दैवी अखेर

# प्रकाशकाचे दोन शब्द

आपल्या भारताची परंपरा थोर, संस्कृतीही थोर. हा देश ऋषिमुनींचा, तसाच थोर सम्राटांचा. शूरांनीं याची शान वाढविली; विद्वानांनीं याची मान उंचावली. कारागिरांनीं याला वैभवसंपन्न केलें; कष्टकऱ्यांनीं याच्या मातीचें सोनें केलें.

असा आहे आपल्या भारताचा थोर इतिहास. अशोक–समुद्रगुप्तांनीं त्याचीं पानें रंगविलीं आहेत. प्रताप–शिवाजींनीं त्याला सोनेरी किनार चढविली आहे. लाल–बाल–पाल या त्रिमूर्तींच्या त्रिगुणात्मक कर्तृत्वाच्या फुलोऱ्यानें तो फुलला आहे; आणि गांधी–सुभाषांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें तो तेजाळला आहे.

आम्हीही त्यांच्या प्रयत्नांत सहभागी होऊं इच्छितों. आमचें लक्ष्य संस्कार. आमची दृष्टि भावी पिढीवर खिळलेली. आम्हांला आमची भावी पिढी सर्व दृष्टींनीं सुदृढ व्हावीशी वाटते. ती ज्ञानी व्हावी तशी बलवानही व्हावी. ती बुद्धिवादी व्हावी तशी झुंजारही व्हावी. ती यत्नवादी व्हावी तशी श्रमवादीही व्हावी.

तरी पण आज आम्हांला हवे आहेत रणझुंजार. केवळ पोषाखी नकोत. वृत्तीचे हवेत. त्यासाठीं आमचा हा उपक्रम. आमचे हे रणझुंजार अखिल भारताचे प्रतिनिधि आहेत. ते कोणा एका विशिष्ट जातीचे वा पंथाचे नाहींत. त्यांचा परिचय करून घ्या व त्यांची झुंजार वृत्ति आपल्या अंगीं बाणवा.

आमचे बाल आणि तरुण वाचक या रणझुंजारांचें सहर्ष स्वागत करतील अशी आम्ही आशा बाळगतों.

आमच्या या उपक्रमाला अनेक मित्रांनीं साहाय्य केलें आहे. त्यांतही विशेष आपुलकीनें साहाय्य करणारे पुण्यांतील प्रथितयश इतिहास-संशोधक व शिव-शाहीर श्रीमान् बाबासाहेब पुरंदरे यांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच ही माला गुंफण्याच्या कामीं ज्या ज्या मित्रांचें आम्हांस वा लेखकांस साहाय्य झालें त्या त्या सर्वांचें ऋण व्यक्त करून आम्ही आमचें हें निवेदन पुरें करितों.

— प्रकाशक

# ऋण

खरंच मी ऋणी आहें. फार फार ऋणी आहे.

कुणाची ? आणि कशासाठीं ? — सांगतें हं.

माझ्या थोर भारतमातेची मी ऋणी आहें. अगदीं पहिलें ऋण हें मानतें मी. तिच्या पवित्र कुशींत मीं जन्मलें. तिच्या विशाल अंगावर मी खेळलें, बागडलें. तिच्याच अन्नावर मी पोसलें, लहानाची मोठी झालें.

सुजला, सुफला, सस्यश्यामला अशी ती माझी थोर माता. थोर थोर ऋषि-मुनींना जन्म देणारी, वीर-वीराङ्गनांना प्रसविणारी, ती माझी माता. उत्तुंग गिरिशिखरांवर विराजमान झालेल्या देवदेवतांच्या पुण्यपदन्यासानें पुनीत झालेली ती माझी माता — तिचें थोरपण मीं काय वर्णावें ? अन् तिचें ऋण मी काय फेडावें ? मग माझा हा अल्पसा प्रयत्न, ही माझी छोटीशी कृति ! कशासाठीं ? तें ऋण फेडण्यासाठीं नव्हे. त्या ऋणाची जाण जागती ठेवण्या-साठीं आहे ती.

आणखी कुणाकुणाची ऋणी आहें मी ? माझ्या मातापित्यांची मी ऋणी आहें. त्यांनीं मला केवळ जन्म दिला नाहीं. त्यांनीं मला खूपखूप दिलें आहे. शब्दांच्या पलीकडचें आहे तें. खरं सांगूं ? माझे वेडेवाकुडे शब्दसुद्धां माझे नाहींत. माझ्या मातापित्यांचीच देणगी आहे ती. ही कृति माझी खरी. पण ती घडविणारे हात मात्र त्यांचे आहेत. त्यांचें हें ऋण मी कसें फेडूं ?

पण मला ह्या ऋणांतून कधींच मुक्त व्हायचें नाहीं.

हें ऋण आहे म्हणूनच मी आनंदांत आहें.

तें ऋण नसतें तर मी सुस्त झालें असतें, निष्क्रिय झालें असतें. तें ऋण मी मानतें म्हणूनच माझ्या भारतमातेच्या सुपुत्रांचें, विशेषतः तिच्या रणझुंजारांचें हें जीवनदर्शन, माझ्या कुवतीप्रमाणें मी तें घडवीत आहें.

आमचे प्रकाशकमित्र श्री. प्रभु यांना रणझुंजारांचा फार अभिमान. त्यांनीं या कृतीला साकार केलें. ह्या दर्शनाचें सर्व श्रेय त्यांचें आहे. त्यांचेंही माझ्यावर हें एक ऋणच नव्हे का ?

— लेखिका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्र. ९०८३ अनुक्रम ...530... दि. ...
... दि. 2/5/...

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन

( जन्म इ. स. १७४० : मृत्यु इ. स. १७९९ )

## १ थोडा पूर्वेतिहास

सन सतराशें एकसष्टांत झालेल्या पानिपतच्या लढाईत कर्तबगार मराठे सरदारांची एक पिढी कापली गेली सारा महाराष्ट्र त्या घटनेनें होरपळून निघाला. तरीपण महाराष्ट्राची शक्ति पूर्णपणें खची झाली, असें मात्र नव्हे. उलट मुशींतून बाहेर पडलेल्या सोन्याप्रमाणें ती अधिकच तेजस्वी झाली, असें आपल्याला दिसेल. सारी उत्तर दणाणून सोडणारा महादजी आणि सारी दक्षिण हादरून सोडणारा परशुरामभाऊ हीं त्या शक्तीचींच जिवंत प्रतीकें होत. हे दोघेहि महापुरुष मराठी साम्राज्याच्या विस्ताराला कारणीभूत झाले. पेशवाईच्या अखेरीच्या धामधुमीच्या काळांत मराठ्यांच्या गादीची प्रतिष्ठा त्यांनींच राखली. परंतु पेशवाईची लाजिरवाणी अखेर पाहण्याची पाळी ह्या दोघांवर आली आणि विशेषतः परशुरामभाऊला तर दुर्दैवानें त्या वेळेच्या कुटिल कारस्थानांना बळी पडून अतिशय वाईट मरण पत्करावें लागलें. खंद्या समशेरीच्या त्या तेजस्वी

पुरुषाचें चरित्र जितकें रोमांचकारक व चित्तवेधक होतें, तितकाच त्याचा शेवट हृदयद्रावक होता.

रत्नागिरीपासून सुमारें अडीच कोसांवर कोतवडें या नांवाचें एक टुमदार गांव आहे. हें पटवर्धनांचें मूळचें गांव. पटवर्धन घराणें हें एक सदाचारसंपन्न आणि कर्मनिष्ठ ब्राह्मण घराणें होतें. या घराण्यांतील पुरुष देवपूजेंत आणि भिक्षुकींत आपला काळ घालवीत. कालांतरानें भिक्षुकीवर प्रपंच चालविणें त्यांना जड जाऊं लागलें आणि आपलें नशीब काढण्यासाठीं या घराण्यांतील हरभट्ट नांवाचा पुरुष देशावर आला. योगायोगानें त्याला इचलकरंजीचे सरदार घोरपडे यांच्याकडे उपाध्येगिरी मिळाली. या हरभटजीस एकूण सात मुलगे होते. त्यांपैकीं रामचंद्र नांवाचा मुलगा मर्दुमकींत पुढें आला. त्यानें घोरपड्यांच्या पदरीं राहून विलक्षण शौर्य गाजविलें. त्यामुळें २४०० स्वारांचें एक पथक पेशव्यांकडून त्याला मिळालें. त्याचाच मुलगा परशुरामभाऊ. तोहि बापाप्रमाणें शूर व लढवय्या निघाला. बाप वारला त्या वेळीं तो फक्त दहा वर्षांचा होता. तरीपण त्याच्या अंगचे गुण इतक्या लहानपणीं प्रकट झाले असल्यामुळें बापाच्याच जागीं त्याची नेमणूक झाली. मूळचाच सरदारी बाण्याचा हा पुरुष खरा वीर होता. निशाण मारणें, भाला फेंकणें वगैरे सर्व प्रकारच्या युद्धकलेंत परशुरामभाऊ लवकरच तरबेज झाले. पुरें चवदावें वर्ष संपतें न संपतें तोंच त्यांना श्रीमंतांच्या स्वारीबरोबर कर्नाटकांत सावनूर-करांशीं सामना देण्यासाठीं जाण्याची संधि मिळाली. सावनूर-

करांशीं झालेल्या या लढाईत परशुरामभाऊंनीं आपल्या पराक्रमाची कमाल केली. श्रीमंतांनीं त्यांची पाठ थोपटून त्यांना पोषाख व जहागीर बक्षीस दिली.

## २ पहिला विजय —

पानिपतावर मराठ्यांचें अपरिमित नुकसान झालें. त्यांत आणखी एका गोष्टीची भर पडली होती. मराठ्यांना कांहीं नवीन शत्रु निर्माण झाले होते. म्हैसूरचा हैदर अली हा त्यांमध्यें अत्यंत प्रबळ होता. म्हैसूरच्या राजास पदच्युत करून त्यानें त्याची गादी बळकावली होती आणि दक्षिणेंतील पाळेगारांपासून जुलमानें खंडणी घेऊन आसपासचीं संस्थानें तो एकामागून एक गट्ट करूं लागला होता. मराठ्यांच्या प्रदेशावरहि तो वारंवार हल्ले करूं लागला होता. हैदरच्या या हल्यामुळें दक्षिणेंतले सारे लोक अतिशय त्रासून गेले होते. त्याचा बंदोबस्त करायलाच हव होता.

श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर गादीवर आलेल्या माधवरावांनीं या संकटाचें गांभीर्य चांगलेंच ओळखलें होतें. गादीवर आल्याबरोबर त्यानी परशुरामभाऊस मुद्दाम मिरजेचा किल्ला व जहागीर दिली. याशिवाय दक्षिणेकडेहि कांहीं मुलूख त्याला दिला. हेतू हा कीं भाऊनें हैदरचा बंदोबस्त करावा. कोल्हापूरकरसुद्धां पेशव्यांना वेळोवेळीं त्रास देत. त्यांच्यावरहि चांगली जरब बसावी हाहि आणखी एक हेतू होता. श्रीमंत

माधवरावांना माणसांची उत्तम पारख होती. परशुरामभाऊंची त्यांनीं केलेली निवड सर्व प्रकारें योग्यच ठरली.

इसवी सन सतराशें चौसष्टांत श्रीमंतांनीं भाऊस हैदरवर चालून जाण्याची आज्ञा दिली. ती पोंचतांच भाऊ आपल्या पटवर्धन-सरदार-मंडळासह तावडतोब कर्नाटकांत उतरले. त्या वेळीं त्यांच्या-जवळ ४०,००० फौज होती. मागून स्वत: श्रीमंत माधवराव पेशवे हेहि स्वारींत सामील झाले भाऊंची फौज कृष्णा नदी उतरून पलीकडे गेली, तोंच हैदरचा फजलउल्लाखान या नांवाचा सरदार त्यांच्यावर चालून आला. भाऊंनीं प्रथम थोडी माघार घेतली. योग्य संधि मिळतांच ते शत्रूवर एकदम तुटून पडले. हां हां म्हणतां खानाचें सर्व सैन्य गारद झालें. भाऊ विजयी झाले !

या पहिल्या विजयानंतर भाऊंचें बळ खूपच वाढलें. हैदरच्या कित्येक सरदारांना त्यांनीं आपल्या तलवारीचें पाणी दाखवलें.

## ३ हैदरचा बंदोबस्त

दक्षिणेकडल्या लहान राजांना या गोष्टीमुळें भाऊंचा मोठा आधार वाटायला लागला. सावनूरच्या नबाबाला हैदरअलीकडून फार ताप होत होता. हैदरच्या या संकटांतून भाऊच आपल्याला वांचवील अशी नबाबाला आशा वाटली. त्यानें काकुळतीचें पत्र पाठवलें आणि त्यांची मदत मागितली. भाऊंना ही एक चांगली संधि होती. ते त्याच्या मदतीला लगेच निघाले. इतक्यांत भाऊंना असें समजलें कीं सावनूरकर आपल्याशीं

कपटी डाव खेळत आहेत. आपला दिवाण हैदरकडे पाठवून ते त्याला खंडणी देऊन सामील होणार आहेत. भाऊंना हें कळतांच ते चवताळले. सावनूरच्या नबाबाला त्यांनीं सक्त ताकीद दिली कीं, " तुम्ही आपल्या दिवाणाला आधीं माघारीं बोलावून आणा. आणि खंडणीचीं बोलणीं बंद करा. या गोष्टी जर तुमच्या हातून न होतील तर एका हैदरअलीचेंच नव्हे, तर त्याच्या बरोबर तुमचेंहि पारिपत्य आम्हांला करावें लागेल. तुम्हांला सावनूर संस्थानाला मुकावें लागेल. "

भाऊंचा हा जबरदस्त निरोप ऐकून नबाब घाबरला. त्यानें आपल्या वकिलाला परत बोलावून घेतलें. भाऊंचें हें जरबीचें वागणें पाहून हैदरसुद्धां थोडासा हादरलाच.

भाऊंचा दणका मोठा विलक्षण असे. शत्रूवर चाल करून जातांना पहिला तडाखा आपला बसला पाहिजे, हें युद्धशास्त्र त्यांनीं आत्मसात् केलें होतें. हैदरवर स्वारी करण्यासाठीं ते निघाले. परंतु मोंगलांच्या सेनापतीप्रमाणें ते शत्रूच्या सैन्याची वाट पाहात थांबले नाहींत. त्यांची फौजाहि सुस्त अजगराच्या चालीनें जात नसे. तर शत्रूवर एकदम तुटून पडत असे. या वेळचेंच पहाना. हैदरअली पुष्कळ लांब होता. तरीपण सावनूरच्या आसपासचा प्रदेश हैदरनें बळकावलेला होता. या प्रदेशावर ताबडतोब हल्ला करून तो जिंकावा आणि हैदरला एक जोरदार धक्का द्यावा असें त्यांनीं ठरवलें. गोपाळरावांच्या मदतीनें चिकबाळापूर, ननगळ वगैरे ठिकाणें जिंकलीं. ते कैवारा येथें आले. तेथें त्यांना बातमी

लागली कीं हैदरचे सरदार चंद्रोजी जाधव आणि बाळाजीपंत हे मोठें सैन्य घेऊन चाल करून येत आहेत. त्याबरोबर हे पटवर्धन सरदार अकस्मात हैदरच्या सैन्यावर चालून गेले. येलुरी गांवाजवळ निकराची लढाई झाली. त्यांत हैदरचे ते दोन्ही सेनापति पटवर्धनांच्या हातीं जिवंत सांपडले.

अशा रीतीनें परशुरामभाऊ आणि त्यांचें सरदारमंडळ हैदरच्या सरदारांची डाळ शिजूं देत नव्हतें स्वारीवर निघाल्यापासून भाऊंना सारखा विजयच मिळत गेला होता. त्यांच्या या विजया-मुळें हैदरअली त्यांच्यावर दांत ओंठ खात होता.

हैदरअलीसुद्धां मोठा योद्धा होता. त्याच्यापाशीं अफाट सैन्य होतें. नाणावलेले सेनापति होते. आत्तापर्यंत स्वतः हैदरअलीच्या सैन्यांशीं मराठ्यांचा सामना झाला नव्हता. परंतु आपल्या सरदारांचा मराठ्यांपुढें निभाव लागत नाहीं, असें पाहून हैदरनें स्वतः स्वारीवर जाण्याचें ठरवलें. वीस हजार घोडेस्वार आणि चाळीस हजार पायदळ घेऊन तो स्वतः स्वारीवर निघाला.

भाऊंचें हैदरच्या हालचालींवर बारीक लक्ष होतें. हैदरला आपल्यावर चालून येण्याची संधि न देतां आपणच त्याच्यावर चालून जावें असा त्यांनीं बेत केला. सावनूरपासून सात कोसांवरच त्यांनीं हैदरच्या सैन्याला गांठलें. स्वतः थोरले माधवराव पेशवे-सुद्धां या स्वारींत सामील झाले होते. लढाईला तोंड लागलें होतें. धुळीनें आणि दारूच्या धुरानें दाही दिशा धुंद झाल्या. दोन्ही सैन्याच्या आरोळ्यांनीं सारें रणमैदान दणाणून गेलें. भाऊंची

समशेर विजेसारखी चमकत होती. हैदरनें रचलेल्या व्यूहाचा छेद करीत ते त्याच्या सैन्यांत घुसले आणि त्याच्या सैन्याची त्यांनीं भयंकर कत्तल केली. भाऊंचें तें अचाट साहस आणि विलक्षण युद्धकौशल्य पाहून स्वतः श्रीमंतसुद्धां थक्क झाले. या निकराच्या लढाईत शत्रूला समोरासमोर तोंड देऊन भाऊंनीं ती जिंकली. हैदर-सारखा बलाढ्य शत्रूसुद्धां शरण आला. ही गोष्ट केवढी कौतुकाची होती ! हैदरनें मराठ्यांशीं तह केला. आणि दोघांचींहि सैन्यें आपापल्या ठिकाणीं परत गेलीं.

## ४ काळ आला होता पण....

हैदरअली फार मानी होता. मराठ्यांकडून झालेला पराभव त्याच्या मनांत सारखा डांचत होता. त्यांतहि पटवर्धन-सरदारांवर तो फारच जळफळत होता. कारण त्याच्या अपयशाला ते कारणीभूत होते. पटवर्धनांनीं केलेली मानखंडना त्याला सहन होत नव्हती. त्यांचा सूड घेण्याची संधि त्याला हवी होती. त्यानें आपल्या सैन्याची पुन्हां जमवाजमव केली. पेशव्यांबरोबर केलेले तह झुगारून दिले. त्यांना दिलेला मुलूख परत जिंकून घेण्याच्या प्रयत्नाला तो लागला. पेशव्यांना मदत करणाऱ्या संस्थानिकांच्या मुलुखांत घुसून त्यानें हलकल्लोळ माजवला.

त्याच्या या नवीन मोहिमेला पहिला बळी पडला मुरारराव घोरपडेचा ! मुराररावानें आपला गुत्तीचा किल्ला तीन महिने

मोठ्या निकरानें लढविला. परंतु हैदरच्या जोराच्या चढाईपुढें त्याचा निभाव लागला नाहीं. शेवटीं त्याला माघार घ्यावी लागली. मराठ्यांच्या एका सेनापतीचा पराभव केल्यामुळें हैदरचा उत्साह वाढला. त्यानें मराठ्यांच्या प्रदेशांत जोराची मुसंडी मारली.

हैदरच्या उठावाच्या या बातम्या पेशव्यांच्या कानांवर येतांच त्यांनीं पटवर्धन बंधूंना पुन्हां हैदरवर पाठविलें. पटवर्धन सरदार आपली फौज व तोफखाना घेऊन निघाले ते कोप्पळवरून सावनुरावर येऊन थडकले. थोड्याच दिवसांनीं स्वतः श्रीमंतहि ह्या स्वारींत सामील झाले. हैदरची उडी धडाडीची असली तरी तो मनांतून मराठ्यांना भीत होता ही गोष्ट तितकीच खरी आहे. तो आपला मुक्काम मराठी सैन्यापासून नेहमींच २५–३० मैल लांब ठेवी. शक्यतों समोरासमोर हल्ले न करतां आडून आडूनच हल्ले करण्याची त्याची पद्धत होती. मात्र हा गनिमी कावा नव्हता. यांत भीतीचीच झांक अधिक होती.

पटवर्धनांचीं पथकें वेगानें दौडत चाललीं होतीं. हैदरचे एका-मागून एक किल्ले सर करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला होता. असे पंधरा डोंगरी किल्ले आणि पंचवीस भुईकोट किल्ले श्रीमंतांच्या ताब्यांत आले होते. आपले किल्ले पेशव्यांच्या ताब्यांत जात चालले, त्यांच्या पराक्रमी सैन्यापुढें आपली कांहींच मात्रा चालत नाहीं हें पाहून हैदर खूपच पिसाळला. आपली ही दुर्दशा पटवर्धन सरदारांमुळें झाली हें तो जाणून होता. ‘या तीन पटवर्धन बंधूंचे तीन तेरा केल्याशिवाय राहाणार नाहीं.’ अशी त्यानें

प्रतिज्ञा केली. यापुढें त्यानें आपलें सर्व लक्ष पटवर्धनांवर केंद्रित केलें. तरीपण त्याला हें पक्कें माहीत होतें कीं पटवर्धन जोंपर्यंत सावध आहेत, तोंपर्यंत आपली डाळ तेथें शिजणें शक्य नाहीं. पटवर्धन एकटेच, बेसावध अवस्थेंत केव्हां सांपडतील याची तो वाट पाहात होता. कांहीं दिवसांनंतर अशी एक संधि त्याला मिळाली. आपला डाव आतां नक्कीच यशस्वी होणार या कल्पनेनें हैदर हुरळून गेला.

या वेळीं पटवर्धनांच्या सैन्याचा तळ मुद्देबिहाळ या गांवाजवळ पडला होता. पेशव्याचें सैन्य बरेंच लांब अंतरावर होतें. पटवर्धनांची फौज एकाकी होती. थोडीशी बेसावध होती. वेळ मध्य-रात्रीची होती. पटवर्धन सरदार, आपापल्या डेऱ्यांत शांत झोंपी गेलेले होते. छावणींतहि सर्वत्र सामसूम झालेली होती. पहाऱ्या-वरचे सैनिक तेवढे गस्त घालीत हिंडत होते. बाहेर मिट्ट काळोख पडला होता. डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नव्हतें. रात-किड्यांच्या कर्णकर्कश किर्रर्र शब्दांनीं रात्रीच्या भयाणपणांत भर पडली होती. इतक्यांत हैदरच्या सैन्यानें पटवर्धनांच्या छावणीवर अकस्मात् छापा घातला आणि तोफा डागण्यास सुरवात केली.

पटवर्धनांना याची कांहींच कल्पना नव्हती. अशा तऱ्हेचा कपटी डाव हैदर आपल्याशीं खेळेल, असें त्यांना वाटलें नव्हतें. त्यांच्या छावणींत एकच गोंधळ उडाला. भयसूचक शिंगें एका-एकीं वाजूं लागलीं. सैनिक जागे झाले. आपापले पोषाख चढवून आणि हत्यारें परजून ते राहुट्यांतून बाहेर पडूं लागले. परंतु ते

जमा होण्याच्या आंतच छावणींत कित्येक ठिकाणीं आगीचा डोंब उसळला. अनेक तंबू जळून खाक झाले. असंख्य सैनिकांचे बळी पडले. कित्येक जण आगीनें होरपळून निघाले. खुद्द पटवर्धन सरदारहि आगीच्या या माऱ्यांतून सुटले नाहींत. गोपाळरावांचें अंग तर भाजून निघालेंच, पण परशुरामभाऊसुद्धां त्या आगींत चांगलेच होरपळून निघाले. अशाहि परिस्थितींत ते सरदार थोडे-सुद्धां गांगरले नाहींत. ते आपापल्या घोड्यांवर स्वार झाले आणि हैदरच्या गोळ्यांचा मार चुकवीत छावणींतल्या सैनिकांना धीर देत हिंडत राहिले. थोडासा अवकाश मिळतांच त्यांनीं आपलाहि तोफखाना सज्ज केला आणि हैदरच्या गोळ्यांना गोळ्यांनीं प्रत्युत्तर दिलें.

पटवर्धनांच्या धारिष्ट्याची कमाल होती. समोर आपल्या सैनिकांच्या प्रेतांचा सडा पडलेला असतांना भीतीचा लवलेशहि त्यांच्या मनाला शिवला नाहीं. एवढ्या भयंकर कल्लोळानें त्यांची छावणी पुरतीच खाक व्हायची. परंतु केवळ परशुरामभाऊंच्या धीराच्या वागणुकीमुळें छावणींतील पडती बाजू सांवरली गेली. इतकेंच नव्हे तर, पटवर्धनांचें सैन्य दोन अडीच तासांचा तुफान मारा सहन करून पहांटेच्या वेळीं शत्रूला तोंड देण्यास पुन्हां खडें झालें.

पटवर्धनांचें तें असामान्य धैर्य पाहून हैदरअली थक्क झाला. त्यांना सहजासहजीं लोळवून टाकण्याची त्याची इच्छा तर सफळ झाली नाहींच. परंतु त्यांचें सैन्य चेव आल्यानें आपल्यावर तुटून

पडण्यास सज्ज होत आहे, हें पाहून त्याची भीतीनें गाळण उडून गेली. उजाडण्यापूर्वींच त्यानें तेथून पळ काढला. या साऱ्या डावांत हैदरच्या शौर्यापेक्षां त्याचे धाडसपच अधिक जाणवते. पटवर्धनांनींसुद्धां सुटकेचा एक निःश्वास सोडला आणि मोठ्या कष्टानें आपला तळ हलवून ते पेशव्यांना येऊन मिळाले.

हैदरच्या कुटिल नीतीनें पटवर्धन सरदार भडकले होते. पेशव्यांचा संताप अनावर झाला होता. हैदरच्या दगाबाजीचा

## ५ मोती तलावावरील महापराक्रम ( सन १७७२ )

सूड घ्यायचाच असा त्यांनीं निश्चय केला. श्रीमंत माधवरावांच्या मनांतून हैदरचा पुरता निःपात डोळ्यांदेखत घडायला हवा होता; परंतु आपल्या हातून हें कार्य तडीस जात नाहीं, निदान आपल्या डोळ्यांदेखत तरी हें घडत नाहीं, असें त्यांना वाटूं लागलें. कारण याचवेळीं दुर्दैवानें ते आजारी पडले. त्यांना क्षयाची बाधा झाली.

या दुखण्यांतून निभाव लागणें कठीण असें त्यांच्या मनानें घेतलें. ते पुण्याकडे परत फिरले. मात्र त्यांनीं हैदरवरील मोहिमेचीं सर्व सूत्रें परशुरामभाऊ पटवर्धन आणि त्रिंबकमामा पेठे या दोन कुशल सेनानींच्या हातीं दिलीं. या नवीन संकटामुळें पेशव्यांचे हे सेनापति मुळींच डगमगले नाहींत. विशेषतः परशुरामभाऊंच्या मनांतून तर हैदरचा पुरता नक्षा उतरवायचा होता. कसल्याहि

संकटाची त्यांना तमा नव्हती. त्यांच्या डोळ्यांसमोर फक्त एकच गोष्ट सतत होती, ती म्हणजे हैदरचा पाडाव.

हैदरचा पाडाव करण्यास ते अगदीं उतावीळ झाले होते. श्रीमंतांची आज्ञा मिळतांच ते तावडतोब आपल्या उद्योगाला लागले. धुळपांचा किल्ला हैदरनें बळकावलेला होता आणि हैदर स्वतः तेथें तळ देऊन बसला होता. हैदर या वेळीं तेथें एकटाच नसून त्याचा महापराक्रमी मुलगा टिपू सुलतान हाहि बापाच्या मदतीकरतां तेथें आला होता. हैदरचें बळ त्यामुळें खूपच वाढलें होतें. तरीसुद्धां भाऊंनीं हैदरवर चालून जाण्याचा निर्धार केला. त्रिंबकरावमामांचें सैन्य अद्याप त्यांना येऊन मिळायचें होतें. तरीपण त्याच्या येण्याची वाट न पाहातां भाऊंनीं हैदरवर चाल केली आणि त्याचा गोट लुटून फस्त केला. या लढाईत हैदरचे नऊशें स्वार ठार झाले. भाऊंच्या सैन्यांतील फक्त पन्नास माणसें जखमी झालीं. शिवाय भाऊंना हैदरच्या चार तोफा, पांचशें घोडे आणि इतर भरपूर लूट मिळाली.

हैदर व टिपू धुळपचा किल्ला सोडून बिदनूर या ठिकाणीं तळ देऊन बसले. बिदनूर हें ठिकाण म्हणजे हैदरचा प्राण होता. मराठ्यांचा मोर्चा आतां बिदनूरकडेच वळला. मराठे त्वेषानें दौडत येत आहेत, हें पाहून हैदर स्वस्थ कसा बसेल? मराठ्यांशीं मैदानांत समोरासमोर लढणें त्याला शक्य नव्हतें. त्याऐवजीं त्यांना बिदनूरच्या रानांतच कोंडावें आणि त्यांचे लचके तोडावे असें त्यानें ठरविलें. त्यासाठीं त्यानें भरपूर फौज गोळा केली. आपली सुमारें ३५

हजार फौज आणि मोठ्या ४५ तोफा घेऊन हैदर बाहेर पडला. हैदर बाहेर पडल्याची बातमी गुप्तहेरांकडून मराठ्यांना समजली. त्यांनीं बिदनूरच्या वाटेवरच त्याच्याशीं सामना देण्याचें ठरविलें आणि त्यानुसार त्यांच्या हालचाली सुरू झाल्या.

पण इतक्यांत मराठ्यांवर आणि विशेषतः परशुरामभाऊंवर दैवानें आणखी एक मोठा आघात केला. परशुरामभाऊंचें स्फूर्ति-दैवत असलेले त्यांचे वडीलबंधु गोपाळराव पटवर्धन हे याच वेळीं अचानक वारले ! गोपाळराव हे पटवर्धन सरदार-मंडळाचे अग्रणी समजले जात. गोपाळराव आणि परशुरामभाऊ म्हणजे राम-लक्ष्मणांची जोडी. दोघेहि एकत्रच स्वारीवर जात. एकमेकांना उत्साह देत आणि एकमेकांच्या आधारानें शत्रूशीं हिरीरीनें लढत. गोपाळरावांचें छत्र नाहींसें होतांच भाऊ एकाकी पडले. तरीपण याहि आघाताला तोंड देऊन भाऊंनीं हैदरवरील आपली मोहीम नेटानें चालविली.

इकडे श्रीमंत माधवराव पेशवे थेऊर मुक्कामीं आपले अंतकाळचे दिवस मोजीत होते. त्यांचें दुखणें दिवसेंदिवस बळावत चाललें होतें. रोजरोज येणाऱ्या त्यांच्या त्या अकाली दुखण्याच्या बातम्या भाऊंच्या हृदयाचें पाणी पाणी करीत होत्या. श्रीमंतांची अतृप्त इच्छा त्यांच्या डोळ्यांदेखतच पुरी करावी हाच एक ध्यास भाऊंनीं घेतला आणि त्रिंबकरावमामांच्या मदतीनें हैदरला शेवटचा जोरदार तडाखा देण्याचें त्यांनीं ठरविलें. हैदरची राजधानी श्रीरंगपट्टण.

त्यावरच चालून जावें असा बेत करून भाऊ व मामा यांनीं आपापल्या सैन्याची नीट रचना केली. आपल्या सैन्याच्या त्यांनीं तीन टोळ्या केल्या. एका टोळीचें नेतृत्व परशुरामभाऊंकडे, दुसरीचें त्रिंबकराव मामांकडे आणि तिसरी कृष्णराव बळवन्त यांच्याकडे देण्यांत आली. दोन्ही सैन्यांची गांठ मोतीतलावावर पडली. त्रिंबकरावानें तर घोर प्रतिज्ञा केली होती कीं, "पन्नास पन्नास कोसांत दिवा लावावयास मी एक गांवदेखील ठेवणार नाहीं." परशुराम भाऊनें हैदरची आघाडी फोडून काढण्याचें ठरविलें. मराठ्याच्या फौजांनीं तिन्ही बाजूंनीं एकदम हल्ला चढवून हैदरच्या सैन्याला बेदम चोप दिला. हैदरच्या फौजेचा विश्वास डळमळला. हैदरला मागें टाकून त्याचे सैनिक वीर पळूं लागले. आपला निभाव लागत नाहीं हें जाणून हैदरनेहि रणमैदान सोडलें. मराठ्यांनीं त्याची सारी फौज धुळीस मिळविली. मराठ्यांना तोफा, बंदुका, पालख्या, हत्ती सारें कांहीं ताब्यांत मिळालें.

लगेच दुसऱ्या दिवशीं मराठ्यांनीं मेलकोट्यावर हल्ला करून तें ठाणें घेतलें आणि ते पट्टणच्या दिशेनें दौडूं लागले. बिदनूर आणि पट्टण जिंकून घेतल्याशिवाय मराठे आतां स्वस्थ बसणार नव्हते. हैदरकडेहि आतां एवढेच महत्त्वाचे प्रांत शिल्लक राहिले होते. भाऊंनीं मोतीतलावावर हैदरचा कणाच मोडून टाकला होता. त्यामुळें हैदरचा सारा जोम नाहींसा झाला होता. तो अगदीं जेरीस आला. त्यानें मराठ्यांशीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं.

या पराभवामुळें हैदरचा सपशेल पाडाव झाला खरा, तरीपण

१४८३५

त्याचा पुरता निकाल लावणें, यावेळीं तरी मराठ्यांना शक्य झालें नाहीं. भाऊंनीं आणि त्रिंबकमामांनीं त्याला पुरतें काबूंत आणलें असतें. परंतु इतक्यांत थेऊराहून श्रीमंत माधवराव पेशवे अत्यवस्थ असल्याचें पत्र आलें. त्यामुळें हैदरशीं घाईनें तह उरकून मराठे सरदार पुण्याकडे निघाले. हैदरच्या मनासारखेंच झालें. त्यानें मराठ्यांचा कर्नाटकांतील सर्व मुलूख त्यांना परत दिला. युद्धखर्चा-बद्दल छत्तीस लक्ष रुपये रोख दिले. आणि दरसाल चौदा लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें.

मराठ्यांना हैदरकडून हें जें कांहीं मिळालें, तें भरपूर होतें, यांत शंका नाहीं. तरीपण हैदर जिवंत राहिला, ही गोष्ट पुढें कांहीं काळ त्यांना तापदायकच ठरली.

१८ नोव्हेंबर १७७२ या दिवशीं श्रीमंत माधवराव पेशवे स्वर्गवासी झाले. पानिपतच्या युद्धांत झालेली भयंकर हानि नुकती भरून निघत होती. तोंच पेशवाईवर या संकटानें घाला घातला. या संकटानें पेशवाईचें सारें वैभव उतरणीला लागलें. पेशव्यांच्या घरांत भाऊबंदकीनें थैमान घातलें. पुढचे पेशवे दुबळे ठरू लागले. त्यामुळें सरदार प्रबळ झाले. त्यांच्या मनांत स्वार्थानें ठाण मांडलें. स्वार्थासाठीं ते आपापसांतच लढूं लागले. किती भयंकर दिवस आले पेशवाईच्या नशिबीं ! पण अशा उतरत्या काळांत उत्कृष्ट सेनापति म्हणून परशुरामभाऊ पटवर्धन यांचें नांव महादजी शिंद्यांइतकेंच प्रसिद्ध आहे. परशुरामभाऊंचें युद्धकौशल्य, त्यांचें शुद्ध चारित्र्य, मराठी साम्राज्याबद्दल त्यांना वाटणारें

विलक्षण प्रेम यामुळें परशुरामभाऊ हे त्या काळांत विशेष प्रसिद्धीला आले.

माधवरावांच्या मृत्यूनंतर वर्षभरांतच श्रीमंत नारायणराव पेशव्यांचा वध झाला. त्यानंतर कांहीं दिवस राज्याची धुरा बारभाईंनीं वाहिली. त्यावेळीं बाल पेशव्याच्या रक्षणाबरोबरच मराठी राज्याचें रक्षण करण्याचीहि जबाबदारी परशुरामभाऊ पटवर्धनांच्यावरच होती. ती त्यांनीं उत्तमप्रकारें पार पाडली.

### ६ इंग्रजांवर मात (सन १७८१):—

मराठ्यांच्या साम्राज्याला निजाम, हैदर, इंग्रज यांसारख्या जळवा लागलेल्या होत्या. मराठ्यांचा एकेक प्रदेश गिळंकृत करण्याच्या लालसेनें हीं गिधाडें टपून बसलेलीं होतीं. मराठ्यांवर होणारा कोणताहि आघात ही या शत्रूंना एक नामी संधि असे. मराठी साम्राज्याच्या उत्तर काळांत अशा संधि त्यांना वारंवार मिळूं लागल्या आणि ते त्याचा फायदा घेऊं लागले. अशाहि काळांत आपल्या अमोघ कर्तृत्वानें मराठशाही सावरून धरण्याचें बिकट काम परशुरामभाऊ पटवर्धन यांनींच केलें.

राघोबादादा हा पेशवाईतला कलिपुरुष म्हणून ओळखला जातो. श्रीमंत माधवरावांच्या वेळेपासूनच त्यानें पेशवाईतला आपला वाटा मागण्यास सुरवात केली होती. व त्यासाठीं आपल्या पुतण्याशीं दोन हात करण्यासाहि त्यानें मागेंपुढें पाहिलें नव्हतें.

याच स्वार्थी राघोबानें केवळ गादीच्या लालसेमुळें आपला पुतण्या नारायणराव याच्यावर गारदी घातले आणि त्याला ठार मारून पेशवाईची गादी बळकावली. मराठे सरदारांच्या आणि विशेषतः बारभाईच्या जागरूकतेमुळें राघोबाला पेशव्यांच्या गादीवर बसतां आलें नाहीं ही गोष्ट निराळी तरीपण त्यानें त्यासाठीं भयंकर कारस्थानें चालविलीं होतीं. बारभाईच्या पुढें आपलें कांहीं चालत नाहीं हें दिसून येतांच राघोबादादा इंग्रजांच्या आश्रयाला गेला आणि त्यांच्या मदतीनें त्यानें पेशव्यांची गादी बळकावण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यानें इंग्रजांशीं तह केला कीं, "जर तुम्ही पेशव्यांचे गादीवर मला बसवाल तर तुम्हांस दोन आणे मी आपल्या राज्यांत देईन." दोन आणे म्हणजे साष्टी, मुंबई बेट व त्याच्या आसपासचा प्रदेश व वसई, असा एकूण १९ लाखांचा प्रदेश. परंतु एवढ्यावर इंग्रज त्याला मदत करण्यास तयार होईनात. शेवटीं हो ना करतां करतां राघोबानें त्यांना चार आणे देण्याचें कबूल केलें आणि मग इंग्रज त्याला पेशव्यांच्या गादीवर नेऊन बसविण्यास तयार झाले.

राघोबाच्या हालचालींवर बारभाईचें पुरें लक्ष होतें. ते तयारींतच होते. बारभाईच्या राजकारणाचीं सर्व सूत्रें नाना फडणिसासारख्या मुत्सद्याच्या हातांत होतीं. इंग्रजांचे डावपेंच नाना उत्तम प्रकारें जाणीत होते. इंग्रजांच्याविषयीं त्यांचे अंदाज अगदीं अचूक ठरले आहेत आणि म्हणूनच नाना जिवंत होते तोंपर्यंत इंग्रजांना मराठशाहींत फारसा शिरकाव करतां आला नव्हता. राघोबाच्या

वतीनें इंग्रज पुण्यावर चाल करून येणार ही गोष्ट नानांनीं अगोदरच ओळखली होती. इंग्रजांच्या सैन्याला तोंड देण्यासाठीं परशुरामभाऊ पटवर्धन, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरिपंत फडके वगैरे प्रसिद्ध सरदार सज्ज होते.

इंग्रजांच्या फौजेंत जनरल् गॉडर्ड, कॅप्टन् स्टुअर्ट ( यालाच मराठे ‘ इस्टुर फांकडा ’ असें म्हणत ), कर्नल इगर्टन, कॅप्टन मॅके यांसारखे नांवाजलेले सेनापति सामील झाले होते. इंग्रजांचें सैन्य मुंबईहून निघालें. त्याला तोंड देण्यासाठीं खोपोली जवळ महादजी शिंदे, बोरघाटाखालीं धुळप व रास्ते आणि वरच्या बाजूला हरिपंत फडके आपापल्या फौजेनिशीं तयार होते. इंग्रजांची रसद वाटेंत मारून त्यांची मुंबईची वाट बंद करण्याचें काम परशुराम-भाऊंवर सोंपविण्यांत आलें होतें. अशा रीतीनें मराठ्यांचें सैन्य इंग्रजांसारख्या कवायती फौजेला टक्कर देण्यासाठीं तशाच स्थितींत खडें झालें होतें.

इतक्यांत इंग्रज सेनापति कॅप्टन मॅके पनवेलवरून रसद आणीत असल्याची बातमी भाऊंच्या कानीं आली. हें कळल्यावर भाऊं-सारखा तडफेचा सेनापति स्वस्थ कसा बसेल ? ती वेळ रात्रींची होती. भाऊंनीं मॅकेच्या तुकडीवर एकदम हल्ला केला. त्याची सर्व रसद मारून आणली. आणि त्याचा सर्व दारूगोळा पेटवून दिला. मॅकेसाहेब कसेबसे आपला जीव वांचवून उजाडतां उजाडतां खोपोलीला येऊन पोंचले. असे हे प्रकार दररोज चालू होते. परशुरामभाऊच्या हल्ल्यामुळें इंग्रज सैन्याला रसद मिळणें अगदीं

अशक्य होऊन गेलें. इंग्रजांचे डेरे गेले. राहुट्या पळविल्या गेल्या. बंदुका हिसकावून घेतल्या. अशा एक ना अनेक गोष्टींमुळें गॉडर्ड साहेबांची अगदीं गाळण उडाली आणि पुण्याला जाण्याचा आपला बेत बदलून ते आडवाटेनें मुंबईला परत गेले. परत तरी ते सुरक्षितपणें गेले काय ? छे ! त्यांच्यावर हरिपंत फडक्यांनीं वाटेंतच अकस्मात् हल्ला करून त्यांना जेरीस आणलें. म्हणजे त्यांना मुंबईलाहि परततां येईना आणि पुण्यालाहि जातां येईना अशा रीतीनें गॉडर्ड वाटेंतच अडकून पडला.

इतक्यांत योगायोगानें 'इस्टुर फांकडा' आडमार्गानें मजल दर-मजल करीत काल्यांच्या जवळ येऊन ठेपला. त्याच्याजवळ फौज-फांटाहि मोठा आणि दारूगोळाहि भरपूर होता. त्यानें मराठ्यांच्या फौजेवर ताबडतोब तोफखान्याचा मारा सुरू केला. लढाईचा रंग बदलणार असें दिसूं लागलें. इतकावेळपर्यन्त मराठ्यांची सरशी होती. आतां तोफांमुळें इंग्रज वरचढ झाले.

इंग्रजांच्या तोफखान्यापुढें मराठ्यांचा निभाव लागेनासा झाला. तेव्हां परशुरामभाऊ आणि हरिपंत हे दोघेहि तडक घाट चढून आले. पानश्यांचा तोफखानाहि त्यांना येऊन मिळाला. तशांतच सुदैवानें मराठ्यांच्या सैन्याला वाराहि अनुकूल असाच वाहूं लागला. पानश्यांचा तोफखाना गर्जूं लागला. इंग्रजांच्या तोफांचा मारा निकामी होऊं लागला. मराठे सैनिकांना जोर चढला. त्यांनीं इंग्रजांवर जोराची चढाई सुरू केली. परशुरामभाऊनें तर आपलें पथक सर्वांत पुढें घेऊन इंग्रजांच्या सैन्याला भिडविलें. इंग्रज

सेनापति इस्टुर फांकडा त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आला. त्याबरोबर मराठ्यांच्या गोलंदाजानें अचूक नेम साधून त्याला नेमकें टिपून काढलें. इस्टुर फांकडा पडला. गॉडर्ड साहेबांनाहि ह्या लढाईत जखमा झाल्या. आणखीहि बरेच इंग्रज अधिकारी मारले गेले. इंग्रज सैन्यांची पळापळ झाली. थोडेच लोक मुंबईपर्यंत परत जाऊं शकले. शेवटीं महादजी शिंद्यांच्या मध्यस्थीनें इंग्रजांनीं सालपें येथें मराठ्यांशीं तह केला. त्या तहान्वयें त्यांनीं राघोबाचा पक्ष पूर्णपणें सोडून दिला. अशा रीतीनें इंग्रजांशीं झालेल्या ह्या पहिल्या लढाईत मराठे विजयी झाले. या लढाईचें यश सर्व मराठे सरदारांचें मिळून असलें तरी त्याचा बराचसा वांटा परशुरामभाऊकडेंच जातो, असें म्हणावें लागेल. कारण त्यानें दाखविलेली तडफ असामान्य होती.

## ७ सुरापूरची मोहीम (सन १७७९)

पशुरामभाऊ पटवर्धन हा नुसता योद्धा नव्हता, तो कुशल सेनापति होता. त्यानें केलेल्या अनेक लढायांत त्याचें शौर्य, धैर्य, तडफ हे गुण तर प्रकट झालेच. पण त्याहिपेक्षां त्याचें युद्धकौशल्य स्पष्टपणें दिसून आलें. पुष्कळांची अशी समजूत आहे कीं मराठ्यांच्या फौजा म्हणजे केवळ बाजारबुणग्यांच्या फौजा होत्या. त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारची शिस्त नव्हती. अर्थात् ही गोष्ट साफ खोटी आहे. असें कांहीं इतिहास सांगत नाहीं परंतु

मराठ्यांची नालस्ती व्हावी, इतकी बेशिस्त मराठ्यांत कधींहि नव्हती असें दिसून येतें. मराठ्यांच्या कित्येक नामवंत सेनापतींना युद्धशास्त्राचा चांगला परिचय होता. परशुरामभाऊ हा तर एक उत्कृष्ट दर्जाचा सेनापति. त्यांना युद्धशास्त्र अवगत होतें. त्यांच्याजवळ प्रदेशांचे नकाशे होते. आणि युद्धाच्या योजना ते आगाऊ आणि विचारपूर्वक आंखीत असत. सुरापूरची मोहीम हें त्याचें एक उत्कृष्ट उदाहरण होय.

सुरापूरचें संस्थान हें एक बेरड संस्थान होतें. सुरापूरकरांचें निजाम व हैदर यांच्यांशीं सख्य होतें. माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशव्यांच्या घरांत जी बेदिली माजली, तिचा फायदा घ्या सुरापूरकरांनींहि घ्यायचें ठरविलें. त्यांनीं बरडोच्या आसपास राहून मंगळवेढ्यापर्यंत मराठी प्रदेशांत दंगल चालविली. त्यावेळीं मराठ्यांचा सर्व कारभार नाना फडणिसाच्या हातांत होता. सुरापूरकरांच्या आक्रमक हालचालींची बातमी नानाच्या कानावर गेली., त्यानें भाऊंना बोलावून सुरापूरकरांचा बंदोबस्त करण्याचें ठरविलें. भाऊ सैन्य जमा करून स्वारीवर निघाले. जातांजातां ते सर्व परिस्थितीचा नीट अंदाज घेत होते. त्यांनीं कांहीं दिवस पंढरपूर येथें तळ दिला. सुरापूरकरांच्या हालचालींची सर्व माहिती मिळविली आणि कांहीं एक योजना पक्की करून त्यांनीं आपल्या स्वत:च्या हालचाली सुरू केल्या. एके दिवशीं भाऊंचें एक पथक बाहेर पडलें. आणि सुरापूरकरांच्या फौजेवर त्यानें अकस्मात् छापा घातला. सुरापूरकरांना हा हल्ला अगदींच अनपेक्षित

होता. त्यांचे शेकडों लोक भाऊंच्या सैनिकांनीं कापून काढले. आणि शेकडों घोडीं पळविलीं. शत्रूला पहिला तडाखा सणसणित द्यावयाचा, हा भाऊंचा नेहमींचा शिरस्ता असे. त्या हल्ल्यामुळें भाऊंच्या सामर्थ्याची चांगलीच चुणूक सुरापूरकरांना दिसली यांत शंका नाहीं.

एवढेंच करून भाऊ थांबले नाहींत. त्यांनीं ताबडतोब शिणगी, देऊर, करजगी इ. महत्त्वाचीं ठाणीं काबीज केलीं. सुरापूरकरांच्या प्रदेशांतून मराठ्यांचा घासदाण्याचा हक्क वसूल केला आणि ते सुरापूरच्या सीमेवर येऊन थडकले. सुरापूरकरांच्या तोंडचें पाणीच पळालें.

वास्तविक सुरापूरकर हाहि एक कसलेला सेनापति होता. भाऊंच्या सैन्याशीं लढण्याची त्यानें तयारी केली होती. परंतु तो हैदर व निजाम यांच्या मदतीवर बराच विसंबून होता. अद्याप त्याला त्यांची मदत मिळाली नव्हती. ती मिळवण्याची त्याची धडपड चालू होती. परंतु तेवढ्यांतच भाऊंचें सैन्य सीमेवर येऊन थडकलें. तेव्हां वेळ घालविण्यासाठीं सूरापूरकरानें भाऊंकडे आपला वकील पाठविला आणि खंडणी देण्याविषयींची चर्चा सुरू केली. परंतु वेळ घालविण्याचें सुरापूरकरांचें हें राजकारण भाऊ ओळखून होते.

भाऊंनीं सुरापूरकरांना काटशह द्यायचें ठरविलें. सुरापूरकर ज्यांच्या मदतीची वाट पाहात होते, त्या निजामाच्या आणि हैदरच्या प्रदेशांत भाऊंनीं आपल्या सैन्याच्या टोळ्या पसरून ठेवल्या.

हेतू हा कीं त्या दोघांनींहि कुरापत काढलीच तर त्यांना तोंड देण्यास आपण पूर्ण तयार आहोंत हें त्यांना कळावें. भाऊंच्या-जवळ सैन्य फक्त २० हजार होतें. परंतु एवढ्या थोड्या सैन्याच्या जोरावर त्यांनीं केवढी धाडसी योजना आंखली होती ! भाऊंची ही रणनीति बिनतोड होती.

एवढी सगळी तयारी करीत असतांनाच त्यांच्या ध्यानांत आलें कीं सुरापुरावर तोफा डागण्यासाठीं शेजारच्या वाकिन-खेड्याची गढी आपल्या ताब्यांत हवी. त्यांनीं तावडतोब आपल्या सैन्याची एक तुकडी वाकिनखेड्यावर पाठविली आणि तें ठिकाण जिंकून घेतलें. वाकिनखेड्याच्या या मोहिमेंत भाऊंच्या सैनिकांनीं पराक्रमाची शर्थ केली. वाकिनखेडें ताब्यांत येतांच भाऊंनीं सुरापुरावरील हल्लयाची तयारी केली. तेव्हां सुरापूरकरांना कळून चुकलें कीं भाऊंच्यापुढें आपली कांहींहि मात्रा चालायची नाहीं. ते भाऊंना शरण गेले ! त्यांनीं मराठ्यांची मागील सर्व थकबाकी पुरी केली. त्याशिवाय मोठा दंड भरला आणि नजराणा म्हणून भाऊंना बरीच रक्कम देऊन संतुष्ट केलें. लढाई थांबली.

या लढाईत भाऊंना मिळालेला विजय हा त्यांच्या रणनीतीचाच विजय होता. त्यांनीं एकाच वेळीं तीन शत्रूंना आपल्या पूर्ण काबूंत ठेवलें आणि तें सुद्धां अगदींच थोड्या सैन्याच्या जोरावर. हैदर, निजाम यांसारखे प्रबळ शत्रू भाऊंच्या विरुद्ध हात उचलण्यास धजावले नाहींत, यावरून भाऊंची योजना किती सडेतोड होती,

हें स्पष्ट दिसून येतें. इंग्रजांनासुद्धां भाऊंबद्दल आदर आणि भीति वाटत असे, ती याच कारणामुळें.

## ८ वाघाशीं झुंज

मराठ्यांचा कट्टर शत्रु हैदरअली इ. स. १७८२ च्या डिसेंबर महिन्यांत पैगंबरवासी झाला. त्याचा मुलगा टिपू गादीवर आला. तो 'बापसे बेटा सवाई' होता. गादीवर आल्याबरोबर त्यानें आपल्या मोहिम ताबडतोब सुरू केल्या. मराठ्यांशीं त्याचें पिढीजात हाडवैर. त्यांतहि पेशवे आणि त्यांचे पटवर्धन सरदार यांच्यावर त्यांचा भयंकर दांत होता. वास्तविक श्रीरंगपट्टणाच्या लढाईत पेशव्यांच्या सैन्यापुढें हैदर आणि टिपू या दोघांनाहि शरण जाणें भाग पडलें होतें. पेशव्यांशीं नामुष्कीचा तह करावा लागला होता. परंतु आतां टिपूनें तो तह बगलेंत मारला आणि त्यांच्या प्रदेशांत धुमाकूळ घालण्यास सुरवात केली.

कर्नाटकांत नरगुंद नांवाचें एक छोटेसें संस्थान होतें. नरगुंदकर हे पेशव्यांचे दोस्त आणि पटवर्धनांचे नातेवाईक होते. नरगुंदकरांचें घराणें उच्च आणि महापराक्रमी म्हणून प्रसिद्ध होतें. टिपूचें लक्ष या संस्थानाकडे गेलें मात्र, त्यानें नरगुंदकरांच्या नरडीचा घोट घेण्याचें ठरवलें. त्यानें त्यांच्यावर जोराचा हल्ला केला.

नरगुंदकरांच्या राज्यावरील हल्ल्याच्या बातम्या हां हां म्हणतां पुण्याला येऊन थडकल्या. पुण्यांतील लोक चवताळून उठले.

मराठ्यांची एवढी प्रबळ सत्ता जिवंत असतांना टिपूने नरगुंदवर हल्ला करावा ही गोष्ट कोणालाहि सहन होण्यासारखी नव्हती. नानानें ताबडतोब परशुरामभाऊ आणि हरिपंत फडके यांना टिपूचें पारिपत्य करण्यास पाठवलें. टिपूचा पाडाव करण्यासाठीं त्यानें एक मोठें कारस्थान रचलें. निजाम व इंग्रजहि त्यांत सामील झाले. तरीपण टिपूचें पारिपत्य करण्याची मुख्य जबाबदारी मराठ्यांनीं, म्हणजेच परशुरामभाऊंनीं उचलली होती.

सर्व तयारी झाल्यानंतर पेशव्यांच्या सैन्यानें इसवी सन १७८६ च्या मे महिन्यांत टिपूच्या प्रसिद्ध बदामी किल्ल्यावर हल्ला केला. बदामीचा किल्ला हा अत्यंत बळकट होता. आणि टिपूनें ठेवलेली ह्या किल्ल्याच्या संरक्षणाची व्यवस्थाहि चोख होती. किल्ल्याच्या भोंवतालीं मजबूत तट असून त्याच्या भोंवतालीं एक प्रचंड खंदकहि होता. तसेंच किल्ल्याच्या सभोंवार जागोजागीं दारूचे बुधलेहि पुरून ठेवण्यांत आले होते.

मराठ्यांचें सैन्य किल्ल्यावर चालून येतांच किल्ल्यावरून त्यांच्यावर बंदुकांच्या फैरी झडूं लागल्या. वीस दिवसपर्यंत एकसारखी झुंज चालू होती; मराठ्यांचे शेंकडों लोक भाजून निघत होते. परंतु तट फोडण्याचा कांहींहि इलाज चालत नव्हता. तेव्हां मराठ्यांनीं एक निकराचा प्रयत्नहि करून पाहिला. त्यांनीं तटाला शिड्या लावल्या आणि त्यावरून ते चढून जाऊं लागले. तटाच्या अगदीं टोंकापर्यंत ते गेले. परंतु इतक्यांत एकाएकीं किल्ल्यांतील लोकांनीं तटावर येऊन त्यांना धडाधड ढकलून दिलें. मराठ्यांचा

हाहि बेत फसला. इतक्यांत टिपूच्या लोकांनीं जमिनींत पुरून ठेवलेल्या दारूच्या बुधल्यांनाहि एकदम बत्ती दिली. त्यामुळें तर मराठ्यांचें पुष्कळसें सैन्य आगीनें होरपळून ठार झालें.

ही बेअब्रू पाहून भाऊ आणि हरिपंत भयंकर संतापले. सुदैवानें याचवेळीं महादजी शिंद्यांची मदत येऊन पोंचली. त्यामुळें मराठे सैनिकांना हुरूप आला आणि ते किल्ल्यावर निकरानें चालून जाण्यास पुन्हां एकदां तयार झाले. या वेळीं मराठ्यांनीं दाखविलेली तडफ असामान्य होती. त्यांच्यांतील एकोपा अपूर्व होता. मारूं किंवा मरूं या कृतनिश्चयानें त्यांनीं पुन्हां एकदां किल्ल्याच्या तटांना शिड्या लावल्या आणि शत्रूच्या माराची पर्वा न करतां ते बेधडक वर चढून गेले. वर गेल्याबरोबर शत्रूवर जोरदार हल्ला चढवून त्यांनीं किल्ल्याची गढी काबीज केली. त्याबरोबर किल्लेदार शरण आला आणि किल्ल्यावर मराठ्यांचा विजयी ध्वज फडफडूं लागला.

बदामी हें टिपूच्या राज्याचें नाक होतें. तेंच मराठ्यांनीं कापल्यामुळें टिपू संतापला आणि मराठ्यांशीं युद्ध करण्याची त्यानें कडेकोट तयारी चालविली. परंतु मराठ्यांच्या पुढें त्याचा कांहींहि निभाव लागला नाहीं आणि याहि वेळीं बेअब्रू मात्र त्याच्या पदरांत पडली. अधिक तयारी करण्याच्या इराद्यानें त्यानें मराठ्यांशीं तह केला आणि हें युद्ध तात्पुरतें थांबलें.

इ. सन १७९०-९१ मध्यें मराठे, इंग्रज आणि निजाम या तिघांनीं मिळून टिपूवर हल्ला करण्याचें पुन्हां एकदां ठरविलें.

आणि तिघांच्याहि फौजा तीन बाजूंनीं टिपूवर चाल करून गेल्या. इंग्रज मद्रासच्या बाजूनें गेले, निजाम दक्षिणेकडून टिपूच्या राज्यांत घुसला आणि मराठ्यांचा सेनापति परशुरामभाऊ पटवर्धन कर्नाटक–धारवाडच्या मुलखांत शिरला. टिपूच्या प्रदेशांत अनेक मजबूत ठिकाणें होतीं. धारवाडपासून एक कोस अंतरावर परशुराम-भाऊनें आपल्या सैन्याचा तळ दिला होता. खुद्द धारवाड हें टिपूच्या प्रदेशांत मोडत होतें. तेथील किल्ला अतिशय मजबूत आणि दुर्भेद्य होता. भाऊंनीं हा किल्ला जिंकण्याचें ठरविलें. भाऊंच्या मदतीला या वेळीं इंग्रजांचा एक सेनापति आला होता. त्यांचें नांव कॅप्टन् लिट्ल्. मराठे त्याला ‘ लिटली ’ असें म्हणत. हा लिटली एक कुशल सेनापति होता. त्याचें वागणें शिस्तीला आणि शिष्टाचाराला धरून असे. भाऊंचा तो दुय्यम सेनापति होता. दुय्यम अधिकारी म्हणूनच तो भाऊंच्या आज्ञेंत वागत असे. भाऊंची व त्याची विशेष गट्टी जमली, याचें कारण दोघां-च्याहि वागण्यांतील साम्य हें होय.

धारवाडच्या किल्ल्याजवळ मैराळ नांवाची एक टेकडी आहे. या टेकडीवर एक मजबूत देऊळ होतें. भाऊ त्या देवळांत बसत आणि तेथून आपल्या सैन्याला मोर्चेबंदीचे हुकूम देत. किल्ल्या-वरील लोकांना भाऊंची ही युक्ति समजली आणि त्यांनीं भाऊंनाच घेरून पकडण्याचा बेत केला. प्रथम त्यांनीं किल्ल्यावरून देवळा-वर गोळे टाकून पाहिले. पण भाऊंनीं त्याला मुळींच दाद दिली नाहीं आणि आपलें ठिकाणहि सोडलें नाहीं. परंतु एके दिवशीं

भाऊ देवळांत जाऊन बसल्याचें कळतांच शत्रूच्या सैन्यानें तावडतोब टेकडीला वेढा दिला आणि भाऊ आंत अडकले! कॅप्टन् लिटली भाऊंच्या जवळच होता. पुढील संकट त्याच्या ध्यानांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. परंतु भाऊंना वांचविण्यासाठीं तूर्त तरी तो कांहींच हालचाल करीत नव्हता.

भाऊंनीं मात्र आपल्या एका अनुभवी सरदाराला शत्रूवर हल्ला करण्यास पाठवलें. त्यानें जोरदार हल्ला करून शत्रूला मागें हटविलें. परंतु तो सरदार मात्र शत्रूच्या एका गोळ्याला बळी पडला.

झालें! भाऊंच्यावर आतां मात्र मोठा बांका प्रसंग गुदरला. तरीहि ते डगमगले नाहींत. त्यांनीं लिटलीला शत्रूच्या सैन्यावर तुटून पडण्याची आज्ञा दिली. परंतु लिटलीला ही गोष्ट नापसंत होती. तो शत्रूवर चालून जाण्याची टंगळ मंगळ करूं लागला. त्या वेळीं भाऊंनीं काढलेले उद्गार वाखाणण्यासारखे आहेत. ते म्हणाले, "आपला एवढा मातब्बर सरदार मारल्यावर शत्रूची गय करून कशी चालेल? शत्रूच्या तोफा पुढें पुढें येत आहेत, त्या पाडाव झाल्याच पाहिजेत. नाहींतर तो थेट मेराळ टेकडी-वरहि चाल करून येईल. कॅप्टन् लिटली, हें काम तुम्ही करीत नसलांत तर तसें स्पष्ट सांगा. आम्ही गाडदी उठवितों, फौजाहि उठवितों." भाऊंचा हा निर्धार पाहून लिटली वरमला, त्यानें लागलीच आपली पलटण आणविली आणि तो तीरासारखा शत्रूवर तुटून पडला. मराठ्यांचीहि त्याला मदत होतीच. दोघांनीं मिळून

शत्रूला चेपीत चेपीत लांब, किल्ल्यापर्यंत नेलें. त्याच्या तोफा हिसकावून घेतल्या आणि शत्रूला परतवून लावलें.

या एकाच गोष्टीवरून भाऊंचा इंग्रजांवरहि केवढा वचक होता, हें ध्यानांत येतें.

## ९ एका इंग्रज सेनापतीला दिलेला धडा

परंतु सारेच इंग्रज सेनापति कॅप्टन् लिटलीसारखे सज्जन नव्हते. कर्नल फ्रेडरिक याच्यासारखे स्वतःच्याच तोऱ्यांत वागणारे सैनापतीसुद्धां इंग्रजी सैन्यांत असत. ते, आपण इंग्रज म्हणजे कांहीं विशेष आहोंत, अशी भावना बाळगीत. मराठ्यांना मान द्यायला ते राजी नसत. दुय्यम अधिकारी म्हणून जरी त्यांची नेमणूक झाली असली, तरी आपणच श्रेष्ठ आहोंत, अशा घमेंडीनें ते वागत. कर्नल् फ्रेडरिक हा अशांपैकींच एक इंग्रज सेनापति होता. टिपूविरुद्धच्या मोहिमेंत त्याची परशुरामभाऊंचा दुय्यम सेनापति म्हणून कंपनीनें नेमणूक केली होती. इंग्रज सैन्याचा तो मुख्य होता ही गोष्ट खरी. पण लढाईची मुख्य जबाबदारी परशुरामभाऊंवर असल्यामुळें त्यांच्या आज्ञेंत त्यानें राहाणें आवश्यक होतें. निदान त्यांच्याशीं बरोबरीनें तरी त्यानें वागावयास हवें होतें. परंतु तो नेहमींच आपल्या गुर्मींत असे. भाऊंनीं त्याचा हा गर्विष्ठपणा ओळखला होता. त्यांनीं

त्याला एक धडा देण्याचें ठरविलें. वास्तविक त्या वेळीं मराठ्यांचें साम्राज्य हिंदुस्थानांत सर्वांत मोठें होतें. त्या साम्राज्याचे भाऊ हे एक प्रतिनिधि होते. शिवाय ते एक कसलेले सेनापति म्हणूनहि त्यांचा नांवलौकिक होता. परंतु घमेंडखोर फ्रेडरिक त्यांना अजिबात मानीत नसे.

धारवाडच्या वेढ्याच्या वेळचीच गोष्ट. किल्ल्याचें रक्षण टिपूचा अनुभवी सरदार बदरुल जमाल करीत होता. वेढा लढविण्याची जबाबदारी परशुरामभाऊ आणि कर्नल् फ्रेडरिक यांच्यावर सोंपविण्यांत आली होती. परंतु कर्नल् फ्रेडरिकला सहकार्याची भूमिका मुळींच पसंत नव्हती. वेढ्याचें काम एकतर भाऊंनीं चालवावें आणि फ्रेडरिकनें स्वस्थ बसावें किंवा फ्रेडरिकनें चालवावें भाऊंनीं गप्प बसावें असें त्याचें मत होतें. भाऊंनींसुद्धां त्याचें हें धोरण ओळखून वागायचें ठरविलें. फ्रेडरिकला ज्या ज्या गोष्टी हव्या होत्या, त्या त्या सर्व त्यांनीं दिल्या आणि त्याच्या इच्छेनुसार वेढा लढविण्याचें स्वातंत्र्यसुद्धां त्यांनीं त्याला दिलें. धारवाडचा किल्ला आपण सहज जिंकूं, अशी फ्रेडरिकची कल्पना. त्यानें किल्ल्याच्या भोंवतीं असलेल्या खंदकांत लांकडाच्या माच्या टाकून घेतल्या. त्यांवरून आपलें सैन्य त्यानें तटापर्यंत नेण्याचें ठरविलें. परंतु त्याच्या सैनिकांनीं त्या माच्यांवर पाय ठेवला मात्र, किल्ल्यावरून तोफांचा आणि बंदुकांचा मारा सुरू झाला. तेलाचे बुधलेहि त्या माच्यांवर फेंकण्यांत आले. त्यामुळें त्या माच्यांनीं पेट घेऊन त्यांत फ्रेडरिकचें बरेंचसें सैन्य भाजून होरपळून निघालें. एकट्यानें वेढा लढविण्याचें

काम कसें अवघड आहे, हें त्याच्या लवकरच ध्यानांत आलें आणि त्याची मिजास चांगलीच उतरली. नंतर भाऊंनीं त्यांच्या योजने-प्रमाणें वेढा पुढें चालविला आणि धारवाडचा किल्ला जिंकून घेतला.

अशा रीतीनें भाऊंनीं युद्धांतील आपलें कौशल्य अनेकदां सिद्ध केलें आहे. इतकेंच नव्हे तर इंग्रजांसारख्या, युद्धशास्त्रांत पारंगत असलेल्या सेनानींहि तें मान्य करावयास लावलें आहे. इंग्रजांना भाऊंची भीति वाटत होती, ती उगीच नव्हे.

## १० खड्र्याची लढाई (इ. सन १७९५)

मराठशाहीची परिस्थिति दिवसेंदिवस फारच बिकट होत चालली होती. महादजी शिंदे, हरिपंत फडके यांच्यासह मातब्बर सेनापति मरण पावले होते. महादजी म्हणजे मराठशाहींतील एक तेजस्वी हिरा! तो हरपल्यामुळें मराठ्यांची एक बाजू चांगलीच खचली यांत शंका नाहीं. सारी उत्तर आपल्या काबूंत ठेवण्याची किमया त्यानें करून दाखविली होती. हरिपंत फडक्यांचेंहि स्थान उत्तर पेशवाईच्या काळांत कोणत्याहि प्रकारें कमी नव्हतें. ज्या कांहीं थोड्या पुरुषांच्या निष्ठेमुळें मराठ्यांचें साम्राज्य प्रतिकूल परिस्थितींतहि उभें राहूं शकलें, त्यांच्यांत हरिपंत तात्या यांचें नांव प्रामुख्यानें घ्यावें लागेल. असे हे दोन अग्रणी नाहींसे झाले. शत्रूंना ही आणखी एक संधि मिळाली. आतां निजामाचे बाहू फुरफुरूं लागले. मराठ्यांच्यांत

कांहीं दम उरला नाहीं, अशीच त्याची कल्पना झाली. परंतु अजूनहि त्याला मराठ्यांकडून चांगला चोप मिळायचा होता, याला तो तरी काय करणार ?

निजामाकडे मराठ्यांची दोन कोटींच्यावर बाकी थकली होती. ती वसूल करण्याकरतां नाना फडणिसांनीं गोविंदराव काळे यांस त्याच्याकडे पाठविलें. गोविंदराव काळे निजामाच्या दरबारांत गेले आणि त्यांनीं नाना फडणिसाचा निरोप त्याला सांगितला. निजाम आणि त्याचा वजीर मशीर उल्मुल्क यांच्या डोळ्यांवर चांगलीच धुंद चढली होती. मशीरनें गोविंदरावाला चांगलेंच सटकावलें. तो म्हणाला, " अजी गोविंदरावजी, तुम्हारा नाना कौन और क्या कलमबंदी है, वो हम नहीं जानते। तुम पूनेमें जाकर उस बम्मनको लेकर निझामसाहबके दरबारमें अदबीसे आव। फिर सुनेंगे क्या चौथ है और क्या सरदेसकी वटवट है।"

तो घमेंडखोर दिवाण एवढेंच बोलून थांबला नाहीं. त्यानें भर दरबारांत पेशवा सवाई माधवराव आणि नाना फडणवीस यांची सोंगें नाचवून त्यांची खूपच टवाळी केली. गोविंदरावाला आपल्या धन्याचा हा अपमान मुळींच सहन झाला नाहीं. त्यानें तेथल्या तेथें सर्वांदेखत प्रतिज्ञा केली कीं, " ह्या मशीर उल्मुल्काची धिंड काढून त्याला पुण्यांत दारोदार हिंडवीन, तरच नांवाचा गोविंदराव." आणि असें बोलून तो तडक पुण्यास परत आला.

नानांना ही हकीगत समजतांच त्यांच्या अंगाची लाही लाही झाली. त्यानें ताबडतोब आपल्या सगळ्या सरदारांना पत्रें पाठवून

निजामाविरुद्ध लढण्यास बोलाविलें आणि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं झाडून सारे सरदार या युद्धांत भाग घेण्यांत सामील झाले. मराठ्यांचें लाखांवर सैन्य गारपिरावर येऊन जमा झालें. या प्रचंड सैन्याचें आधिपत्य परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याकडेच देण्यांत आलें होतें.

तिकडून निजामहि एक लाख फौज घेऊन पुण्याच्या रोखानें निघाला. खर्ड्याच्या विस्तृत पटांगणांत दोन्ही सैन्यें समोरासमोर आलीं आणि युद्धाला तोंड लागलें. भाऊंनीं युद्धाची सर्व मांडणी योजनापूर्वक केली होती. त्यांनीं प्रत्येक सरदाराला त्याची जागा ठरवून दिली; आणि कोणी, केव्हां व कसे हल्ले करावयाचे याच्याहि सर्व सूचना आगाऊच दिल्या. स्वत: भाऊ निवडक वीस हजार लोकांचें एक पथक घेऊन त्यांच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें शत्रूची फळी फोडून आंत घुसले आणि भयंकर कापाकापी करून शत्रूचे असंख्य सैनिक गारद केले.

मराठ्यांच्या चौफेर हल्ल्याला तोंड देणें निजामसाहेबाला अशक्य झालें. त्याच्या सैन्यांत पळापळ सुरू झाली. आणि त्याच्या सैन्याची पूर्ण वाताहात झाली निजामाचा दिवाण मशीर उल्मुल्क मराठ्यांच्या हातीं सांपडला. पेशव्यांच्या हातांत लोटा देऊन त्यांना काशीला पाठवण्याची इच्छा करणाऱ्या मशीरलाच पेशव्यांच्या पुढें पाण्यासाठीं लोटा हातीं घ्यावा लागला. गोविंदरावानें मशीरची भर पुण्यांत धिंड काढून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली.

अशा रीतीनें सर्व मराठे सरदारांनीं आपली सर्व शक्ति एकवटून जिंकलेली ही शेवटचीच लढाई. या महत्त्वाच्या लढाईंत विजय मिळाल्यानें मराठ्यांच्या रणदुंदुभि गर्जू लागल्या आणि त्यांच्या निनादाबरोबर मराठ्यांची कीर्ति भारताच्या कानाकोपऱ्यांत पुन्हां एकदां दुमदुमली. त्याचबरोबर या युद्धाचें नेतृत्व ज्यांच्याकडे होतें त्या परशुरामभाऊंच्या नांवाचा भारतभर जयघोष झाला. इतकेंच नव्हे तर खुद्द श्रीमंतांनीं परशुरामभाऊ व त्याचे बंधु यांचा खास गौरव करून मिरज-तासगांवची पंचवीस लाखांची जहागीर बहाल केली.

## ११ दुर्दैवी अखेर

सतराशें पंचाण्णव हें साल मराठ्यांच्या इतिहासांत जितकें रोमांचकारी होतें, तितकेंच तें अपशकुनीहि होतें असें म्हणावें लागेल. खर्ड्याचा संस्मरणीय विजय मराठ्यांनीं याच वर्षीं मिळविला, परंतु हा विजय मराठशाहीचा परमोच्चबिंदू ठरून येथूनच मराठशाही कोसळण्यासहि सुरवात झाली. पेशवा सवाई माधवराव मरण पावला. तो कसा मेला, याची छाननी करण्याचें कांहींच कारण नाहीं. पण त्याच्या मरणानंतर मराठशाहीची घडी जी विस्कटली, ती त्यानंतर पुन्हां कधींहि कोणालाहि नीट बसवितां आली नाहीं.

सवाई माधवरावाला मूलबाळ नव्हतें. त्यामुळें पेशवाईला नवा धनी शोधण्याची पाळी लगोलग आली आणि यांतूनच भयंकर

कारस्थानांना नुसता ऊत आला. दुसरा बाजीराव आणि चिमाजी आप्पा हे दोन राघोबादादांचे मुलगे हयात होते. परंतु त्यांच्या-पैकीं कुणाला गादीवर बसवावें, हें निश्चित् ठरवितां येत नव्हतें. बाजीरावाला पेशवा केलें, तर तो नानासकट सगळ्यांचा काटा काढणार. त्याला पेशवा न करावें, तर शिंद्यांसारखे मतलबी सरदार कारस्थानें रचणार. नानांच्या पुढें मोठाच पेंच उभा राहिला. या एवढ्याच प्रश्नावरून शिंदे, होळकर, पेशवे, पटवर्धन, फडके वगैरे सारी मंडळीं नानांच्या विरुद्ध गेली. नानांचे सारे मित्र एकदम शत्रू बनले. आणि नानांचें आसन अतिशय डळमळीत झालें. नानांना तें पुन्हां सावरतां आलें नाहींच, शिवाय तें सांवरण्याच्या प्रयत्नांत परशुरामभाऊंसारखा एक तेजस्वी मोहरा मात्र फुकट बळी पडला. नानांच्या काय किंवा भाऊंच्या काय, पायाखालची वाळू सरकूं लागली आणि त्यांतच या दोघां महापुरुषांचा दुःखद अंत झाला.

ही सर्व घटना एकंदरींत भयप्रद अशीच होती. तरीपण हा सर्व बनाव बनत असतांना परशुरामभाऊंनीं दाखविलेला कणखरपणा आणि पेशव्यांच्या गादीची निष्ठा कौतुकास्पद होती, असें आपल्याला दिसून येतें. नानांचा विचार पक्का होईना, म्हणून त्यांनीं दरबार भरविला. त्यांत सर्वांच्या संमतीनें असें ठरलें कीं सवाई माधवरावांची पत्नी यशोदाबाई हिच्या मांडीवर दत्तक देऊन तो मोठा होईपर्यंत त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवावा. या सूचनेला सर्व सरदारांची संमति मिळाली, पण दौलतराव

शिंद्यांचा दिवाण बाळोबातात्या कुंजीर यानें एकट्यानें मात्र विरोध केला. तो बाजीरावाचा पक्षपाती होता. बाजीरावाकडून गादीच्या मोबदल्यांत त्याला कांहीं मुलूखहि मिळणार होता.

कुंजीरांचा विरोध पाहून नाना फडणीस मनांतून चरकले. वास्तविक नानांना भिण्यासारखें कांहींच नव्हतें. कारण भाऊं-सारखा प्रबळ सरदार त्यांच्या पाठीशीं होता. परंतु नाना हे प्रथम-पासूनच समशेरीचे ढिले होते. तेव्हां त्यांनीं असा विचार केला कीं कुंजीर पुढें बाजीरावाला पेशव्यांच्या गादीवर बसविण्यासाठीं धडपड करणारच. तेव्हां आपणच जर बाजीरावाला गादीवर आणून बसविलें तर आपलाहि बोज कायम राहील आणि शिंद्यालाहि वरचढ होण्याची संधि मिळणार नाहीं.

नानांनीं हाच विचार पक्का केला. बाजीराव या वेळीं शिवनेरी किल्ल्यावर कैदेंत होता. भाऊंना पाठवून त्यानें बाजीरावास पुण्याला आणलें आणि उभयतांच्या आणाशपथा होऊन त्यास गादीवर बसविलें. सर्व कारभार पूर्वीप्रमाणेंच नानांच्या हातांत राहिला.

परंतु आपल्याला न विचारतां नानानें हें जें कारस्थान केलें, त्यामुळें कुंजीर संतापला आणि नानांचा डाव हाणून पाडण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. एवढेंच करून तो थांबला नाहीं, तर त्यानें आपली सर्व पलटण पुण्याला बोलाविली आणि या गोष्टीमुळें नानांचा पाय घसरला तो घसरलाच. नानांची भीतीनें गाळण उडाली आणि ते साताऱ्याला पळून गेले. परशुरामभाऊंनीं त्यांचें

मन वळविण्याचे खूप प्रयत्न केले. परंतु त्याचा कांहीं एक उपयोग न होतां नाना पळाले ते पळालेच.

नानांनीं अशा तऱ्हेनें भिऊन पळ काढला, ही गोष्ट भाऊंना मुळींच रुचली नाहीं. त्यांना नानांचा अतिशय राग आला. नानांचा आपल्यावर विश्वास नाहीं, अशीच त्यांची समजूत झाली व त्यामुळें पस्तीस वर्षांचा त्यांचा स्नेह कायमचा संपला.

नाना पळून गेल्यामुळें त्यांची योजना फसते कीं काय अशी भीति निर्माण झाली; परंतु परशुरामभाऊंनीं हातीं घेतलेलें कार्य शेवटास नेण्याचा निश्चय केला आणि त्यासाठीं राज्यकारभाराची सारी धुरा त्यांनीं स्वतःच्या शिरावर घेतली. परशुरामभाऊ पेशव्यांचे मुख्य दिवाण झाले. पुढें त्यांनीं कुंजीरालाहि आपल्या बाजूला वळवून घेतलें. त्यामुळें शिंदे व पटवर्धन यांचा एक प्रबळ गट निर्माण झाला.

पुढें कांहीं दिवसांनीं या दोघांचें मन बदललें. बाजीरावाबद्दल त्यांना अजिबात भरंवसा वाटेना. म्हणून त्यांनीं चिमाजी अप्पालाच यशोदाबाईच्या मांडीवर बसविलें आणि ‘ पेशवा ’ म्हणून त्याच्या नांवाची द्वाही चोहींकडे फिरविली.

नाना सातारला गेले. तरी भाऊंनीं मधून मधून त्यांची सल्ला-मसलत घेण्याचेहि प्रयत्न केले. परंतु नाना भाऊंच्याविषयीं अविश्वास दाखवूं लागले. त्यामुळें त्या दोघांतील तेढ विकोपाला गेली. नाना फडणवीस जबर कारस्थानी होते. ते मोकळे राहाणें

हें मोठें घातुक होतें. शिंदे-पटवर्धनांना याची पूर्ण जाणीव होती. म्हणून त्यांनीं नानांना नजरकैदेंत ठेवण्याचा प्रयत्न केला. पण नाना कसले वस्ताद. ते या सर्व सरदारांचें बारसें जेवले होते. त्यांनीं त्यांच्या हातांवर तुरी दिल्या आणि ते महाडला जाऊन राहिले. आपला पाठलाग होऊं नये, म्हणून नानांनीं सर्व घाटांतून कांटे पसरून, चर खणून सर्व मार्ग बंद केले. मोठमोठीं झाडें तोडून तीं आडवीं टाकलीं. येथूनच त्यांनीं आपली गेलेली सत्ता परत मिळवण्यासाठीं अनेक प्रकारचीं कारस्थानें सुरू केलीं. तीं करतांना मराठी साम्राज्याविषयींच्या निष्ठेपेक्षां स्वार्थ आणि त्यांची अधिकारलालसाच मोठी होती, असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. कारण निजाम, इंग्रज, सिद्दी यांसारखे मराठ्यांचे हाडवैरी त्यांनीं जवळ केले आणि त्यांच्या मदतीनें भाऊंच्या कारभाराला शह देण्याचे उद्योग त्यांनीं सुरू केले.

शिंद्यांच्या पक्षांतहि नानांनीं फूट पाडली. स्वतः शिंदे नानांना आंतून सामील झाले आणि त्यानीं आपला दिवाण बाळोबा कुंजीर यास अचानक कैदहि केलें. येथून राजकरणाचें सर्व पारडें फिरलें.

पेशवे चिमाजी अप्पा यांना व भाऊंना कैद करण्याचा मनसुबाहि नानांनीं रचला. कांहीं गफलतींमुळें भाऊंना त्याचा वेळींच सुगावा लागला. भाऊंच्या पोटांत चर्रर्र झालें. वेळ रात्रीची होती. भाऊंनीं लष्करी पोषाख चढविला. अंगांत चिलखत घातलें. पाठीशीं ढाल बांधली आणि दोन हातांत दोन पट्टे चढवून ते तावडतोब पेशव्यांच्या वाड्यांत शिरले. श्रीमंतांना त्यांनीं जागें केलें. त्यांनाहि

पोषाख चढविला आणि जिवाला जीव देणारे निवडक लोक घेऊन, श्रीमंतांना पाठीशीं बांधून भाऊ वाड्याबाहेर पडणार इतक्यांत पूर्वी ठरलेल्या कारस्थानाप्रमाणें निजामाची ५०,००० फौज



श्रीमंतांना वाचविण्यासाठींच

पुण्यांत घुसली. त्या सैन्यानें शनवारवाड्याला गराडा घातला. आतां आपण त्यांच्या हातीं सांपडणार असें पाहतांच भाऊ एका खंद्या घोड्यावर स्वार झाले. श्रीमंतांना आपल्यापुढें घेतले आणि दोन्ही हातांतील पट्टे विजेसारखे फिरवीत वाड्याबाहेर एकदम उसळी मारून शत्रूच्या देखत भरधांव घोडा फेंकीत ते निघाले. त्यांच्या पाठलगावर निजामाची ५०,००० फौज निघाली. मोठ्या शर्तीनें ते शिवनेरीला पोंचले. श्रीमंतांना किल्लेदाराच्या स्वाधीन

ग्रं. क्र. ११४४५



केलें. श्रीमंतांची सुटका झाली आहे, हें पाहतांच ते तसेच मागें आले. इतक्यांत निजामाची फौज त्यांना येऊन भिडलीच. त्यांना आपला शेवट कळून चुकला. पण आपलें कर्तव्य आपण केलें आहे, या आनंदाच्या जाणीवेमुळें ते मुळींच घाबरले नाहींत, उलट या पन्नास हजार फौजेवर ते एकटे तुटून पडले. कित्येक आसामींना त्यांनीं जमिनीवर लोळवलें. परंतु शेवटीं नाइलाज होऊन त्यांना शत्रूच्या स्वाधीन व्हावें लागलें. मूर्तिमंत राजनिष्ठा, देशबुडव्यांच्या हातीं कैद झाली. जातिवंत पराक्रम खलांच्या पाशांत अडकला.

यानंतर इतिहास जें कांहीं सांगतो तें हृदयद्रावक आहे. भाऊंची शत्रूच्या कैदेंतून सुटका झाली खरी, पण तिचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं. भाऊंच्या आयुष्याची शोकांतिकाच व्हायची होती. भाऊंच्या सुटकेनंतरहि मराठशाहींत कारस्थानें चाललींच होतीं. अशाच एका कारस्थानाचा परिणाम म्हणजे भाऊंचा दुर्दैवी अंत !

REFBK-0014436

REFBK-0014436

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ........ दि: ................
क्रमांक ............ नों. दि ..........